**अवतार मेहेरबाबा परपेच्युअल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट**

# रहिवाश्यांसाठी आचारसंहिता (Resident Code of Conduct)

**(सप्टेंबर २०२५ मध्ये संशोधित)**

रहिवाश्यांसाठी तयार करण्यात आलेल्या या आचारसंहितेमध्ये ("आचारसंहिता"), अवतार मेहेरबाबा परपेच्युअल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, अवतार मेहेरबाबा ट्रस्ट ("फर्स्टली"), मेहेर फ्री डिस्पेन्सरी (मेहेराझाद) आणि मेहराझाद पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांना एकत्रितपणे "ट्रस्ट" असे संबोधले जाईल.

अवतार मेहेरबाबा ट्रस्टच्या मूळ विश्वस्तपत्रात (ट्रस्ट डीड), ज्यास अवतार मेहेरबाबांनी मान्यता देऊन स्वाक्षरी केली होती, बाबांनी आपल्या ट्रस्टसाठी अनेक उद्दिष्टे निश्चित केली होती. जे प्रेमी ट्रस्टच्या माध्यमातून बाबांची सेवा करण्याचा मार्ग निवडतात त्यांच्यासाठी ही उद्दिष्टे आजही बाबांच्या इच्छाच आहेत. येथील रहिवासी सदस्यांसाठी बाबांच्या या इच्छा मेहेराबाद, मेहेराझाद आणि ट्रस्ट कार्यालयातील जीवनाचा आराखडा तसेच पाया प्रदान करतात. या अत्यंत पावन भूमीच्या समीप राहणे, जिथे बाबांच्या उपस्थितीची अनुभूती अत्यंत गहिरीपणे होते, हे केवळ एक आशीर्वाद नसून एक जबाबदारीही आहे. यामुळे रहिवासी सदस्यांना बाबांच्या पवित्रतेने पावन झालेल्या वातावरणात राहण्याचा विशेष बहुमान मिळतो, तसेच त्यांच्या विश्वस्तपत्रातील उद्दिष्टांमध्ये नमूद केलेल्या त्यांच्या इच्छांची पूर्तता करण्यास सहाय्य करून सेवेद्वारे आपले प्रेम व्यक्त करण्याच्या विपुल संधीही उपलब्ध होतात.

१९६९ पासूनच्या आपल्या बहुतांश इतिहासात, ट्रस्टचे नेतृत्व प्रथम बाबांची बहीण आणि निकटची शिष्या मनी यांनी, आणि त्यानंतर मेहेरबाबांच्या मंडळीतील सदस्य भाऊ कलचुरी यांनी केले. आता ट्रस्टने अशा टप्प्यात प्रवेश केला आहे की तिचे नेतृत्व यापुढे मंडळीतील सदस्याकडे न राहता इतरांकडे सोपवले गेले आहे. त्यामुळे विश्वस्तांना असे वाटते की वर्तमान आणि भावी रहिवासी सदस्यांसाठी मार्गदर्शक ठरतील अशी तत्त्वे एका अधिकृत आचारसंहितेत स्पष्टपणे मांडण्याची ही योग्य वेळ आहे.

## १. 'रहिवासी' (Resident) कोण? :

या संहितेच्या (Code) उद्देशाने, 'रहिवासी' म्हणजे ट्रस्टच्या आवारात राहणारी व्यक्ती, ट्रस्टद्वारे प्रायोजित केलेले निवासी आणि ट्रस्टच्या आवाराबाहेर राहणारे इतर नियमित स्वयंसेवक. या व्याख्येत निवासी म्हणून पात्र ठरणाऱ्या विश्वस्तांचाही (Trustees) समावेश होतो.

**२. एक व्यापक तत्त्व:**
या संहितेत वर्णन केलेली तत्त्वे सर्वसाधारण स्वरूपाची असल्याने, उद्भवू शकणाऱ्या प्रत्येक परिस्थितीचा यात समावेश करणे शक्य नाही. त्यामुळे, रहिवाशांनी अवतार मेहेरबाबा यांनी दिलेल्या आध्यात्मिक मूल्यांवर आधारित सुज्ञपणा आणि योग्य विवेकबुद्धीचा वापर करणे अपेक्षित आहे.

**३. वर्तन आणि सचोटी:**
अ. बाबा प्रेमी आणि सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने प्रत्येक रहिवासी हा ट्रस्टचे प्रतिनिधित्व करतो. त्यानुसार, रहिवाशांनी नैतिक AMBPPCT – “रहिवासी आचारसंहिता सुधारित आवृत्ती - सप्टेंबर 2025" चे पालन करणे आवश्यक आहे.
आणि त्यांचे नैतिक आदर्श अवतार मेहेरबाबांनी दाखवलेल्या सर्वोच्च आध्यात्मिक मूल्यांनुसार आणि आचरणानुसार असावेत. त्यांचे आचरण असे असले पाहिजे की ते इतरांसाठी एक आदर्श असेल आणि त्यातून निस्वार्थीपणा व्यक्त होईल.

ब. ट्रस्टचे हित सर्वोपरि ठेवत रहिवाशांनी प्रामाणिकपणे आणि सारासार बुद्धीने वागले पाहिजे. त्यांनी स्वत:साठी, त्यांच्या कुटुंबासाठी, त्यांच्या मित्रांसाठी, किंवा त्यांच्याशी संलग्न असलेल्या कोणत्याही बाह्य संस्था, गट किंवा असोसिएशनच्या आर्थिक किंवा इतर लाभासाठी कार्य करू नये.

क. रहिवाशांचे आचरण त्यांच्या प्रत्येक कृतीत मेहेरबाबांचा प्रेम आणि सत्याचा संदेश प्रतिबिंबित करणारे असावे . जसे घाणीमुळे महासागर कधीही दूषित होत नाही, तसेच प्रियतमाच्या प्रतिमेला काहीही मालिन किंवा कलंकित करू शकत नाही, मात्र निष्काळजी, अनादरयुक्त, उध्दट किंवा अप्रामाणिक वर्तनामुळे आपण देऊ केलेल्या त्यांच्या सेवेतील पावित्र्य व सौंदर्य कमी होऊ शकते आणि या युगाच्या अवताराला वंदन / आदर करण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या त्यांच्या प्रेमींच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात.

ड. रहिवाशांनी एकमेकांशी सुसंवादाच्या भावनेने वागावे, बाबांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार असे कोणतेही शब्द किंवा कृती टाळाव्यात ज्यामुळे कोणाची हानी होईल किंवा किल्मिष निर्माण होतील, आणि ट्रस्टच्या मालमत्तेवरील आध्यात्मिक वातावरण अबाधित राहू द्यावे. इतरांचा कोणत्याही प्रकारचा शारीरिक, मौखिक, भावनिक किंवा लैंगिक स्वरूपाचा छळ किंवा धमकी, स्वीकारली जाणार नाही.

**४. ट्रस्टच्या मालमत्तेवरील मानद  सेवा (Honorary Seva):**

अ. रहिवाशांची एक मुख्य जबाबदारी म्हणजे निस्वार्थपणे सेवा अर्पण करणे . मेहेरबाबा याबाबत अतिशय आग्रही होते की सेवा प्रेमाने, दयाळूपणे आणि उदारतेने केली पाहिजे. बाबांचे शब्द हे अत्यंत सुंदररीत्या व्यक्त करतात: **"प्रेम देण्यात आनंद मानते आणि त्यातच गौरव अनुभवते, घेण्यात नव्हे; म्हणून प्रेम करायला आणि  द्यायला शिका , आणि इतरांकडून काहीही अपेक्षा ठेवू नका**" .

ब. रहिवाशांनी याची जाणीव ठेवावी की ट्रस्टच्या परिसरात बाबांना अर्पण केल्या जाणाऱ्या सेवेमध्ये ट्रस्टने रहिवाशांना दिलेल्या सेवेच्या संधी स्वीकारणे हे ही अंतर्भूत आहे .

क. ट्रस्टद्वारे प्रायोजित रहिवासी आणि ट्रस्टच्या परिसरात वास्तव्यास असणारे सर्वजण प्रियतम बाबांना जीवन अर्पण करण्यासाठी येथे आहेत. सर्वसाधारणपणे अशी  अपेक्षा आहे की ते ट्रस्टच्या कार्यांद्वारे बाबांना सेवा अर्पण करण्यासाठी आपल्या वेळेचा लक्षणीय भाग समर्पित करतील.

**५. पक्षपात, भेदभाव व छळ नाही:**

सर्व रहिवाशांनी एक असे वातावरण निर्माण व संवर्धित करावे, जिथे ट्रस्टच्या अंतर्गत स्त्री व पुरुषांना त्यांच्या पदाचा विचार न करता समान वागणूक दिली जाईल. त्यांच्या कर्तव्यांचे पालन करताना रहिवाशांनी घेतलेले निर्णय केवळ प्रामाणिकपणा व सुसंवादाच्या भावनेवर आधारित असावेत.

**६. देशाच्या कायद्यांचे पालन:**

बाबांनी स्पष्टपणे ही इच्छा व्यक्त केली होती की त्यांच्या प्रेमींनी देशाच्या कायद्याचे पालन करावे. त्यामुळे सर्व रहिवाशांनी देशाचे कायदे, नियम व नियमावली पूर्णतः व काटेकोरपणे पाळली पाहिजे. ट्रस्टद्वारे प्रायोजित रहिवाशांनी कायदा न मोडणे ही आपली जबाबदारी समजून स्वीकारली पाहिजे; कायद्याचे उल्लंघन झाल्यास बाबांच्या इच्छेचा अनादर तर होतोच पण त्याच बरोबर ट्रस्टची प्रतिष्ठा व शासकीय अधिकाऱ्यांशी असलेले चांगले संबंधही धोक्यात येऊ शकतात.

**७. राजकीय संलग्नता नाही:**

रहिवाशांनी कोणत्याही राजकीय उपक्रमाशी संलग्न असू नये किंवा त्यात सहभागी होऊ नये.

**८. धर्मपरिवर्तन (Proselytising) नाही :**

मेहेरबाबांनी वारंवार स्पष्ट केले आहे की त्यांच्या कारणाने कोणीही आपला धर्म बदलावा किंवा नवीन धर्म स्वीकारावा अशी त्यांची इच्छा नव्हती.  त्यांनी सर्व धर्माचा आदर केला आणि प्रत्येक धर्म प्रामाणिकपणे आचरणात आणला तर तो एकाच सत्याकडे घेऊन जातो असे सांगितले.  मेहेरबाबांनी हे ही अधोरेखित

केले कि त्यांचा संदेश प्रसारित करण्याचा सर्वोत्तम मार्ग उपदेशातून नव्हे, तर त्या संदेशांनुसार जीवन जगण्यात आहे - प्रेम , प्रामाणिकपणा , नम्रता आणि निस्वार्थ सेवा यांच्या माध्यमातून —प्रवचनांद्वारे नव्हे.

**९. विधी, रीतिरिवाज आणि समारंभ नाहीत:**

ईश्वरावरील प्रेम आणि दैनंदिन जीवनातील प्रामाणिकपणा हे विधी, रीतिरिवाज आणि समारंभांपेक्षा कितीतरी अधिक महत्त्वाचे आहेत—हेच अवतार मेहेरबाबांच्या शिकवणीचे सार आहे.

**१०. अमली पदार्थ निषिध्द :**

मेहेरबाबांनी त्यांच्या प्रेमींना दिलेल्या सूचनांनुसार, रहिवाशांनी सर्व बेकायदेशीर किंवा वैद्यकीय सल्ल्याविना वापरल्या जाणाऱ्या औषधांचे/ अंमली पदार्थांचे सेवन टाळले पाहिजे, ज्यात हशीश, भांग, अफू इत्यादींचा समावेश आहे. कोणतीही व्यक्ती अशी औषधे वापरताना किंवा स्वतःजवळ बाळगताना आढळल्यास तिला त्वरित ट्रस्टच्या परिसरातून जाण्यास सांगितले जाईल आणि तिच्या स्वयंसेवी जबाबदाऱ्यांतून तिला मुक्त केले जाईल.

**११. गूढ/अलौकिक साधना (Occult Practices) नाहीत:**

या मार्गदर्शक तत्त्वांच्या दृष्टीने, "गूढ साधना"या संज्ञेत स्वयंचलित (बाह्य शक्तींद्वारे आपले हात चालणे) लेखन किंवा आत्मिक संवादाचा समावेश होतो, ज्यामध्ये रेकी, प्राणिक हीलिंग किंवा तत्सम तंत्रांचा वापर करून अदृश्य घटकांकडून संदेश प्राप्त करण्याचे दावे केले जातात; तसेच अलौकिक किंवा मानसिक क्षमतांचे दावे—जसे द्रष्टेपण, चॅनेलिंग, माध्यमत्व, भविष्यकथनासाठी टॅरो कार्ड्स किंवा ओइजा बोर्ड्ससारखी साधने वापरणे; किंवा परिणामांची भविष्यवाणी किंवा प्रभाव टाकण्याच्या हेतूने केलेले कोणतेही पंथीय विधी—आणि "विशेष शक्ती" प्रदान करण्याचे किंवा विकसित करण्याचे दावे समाविष्ट आहेत. अशा सर्व क्रियाकलापांना सक्त मनाई आहे आणि अवतार मेहेरबाबांच्या इच्छांशी सुसंगत राहून, केवळ मेहेरबाबांवर आपले लक्ष केंद्रित ठेवणे आवश्यक आहे.

**१२. विविध धर्म व संस्कृतींच्या सारतत्त्वांविषयी उदारमत :**

"**नवीन जागतिक संस्कृती, जी एकात्म दृष्टीतून उदयास येईल, ती विविध परंपरांचे आपोआप एकत्रीकरण करेल. नवीन जागतिक संस्कृतीला प्रेरणा देणारी दृष्टी सर्वसमावेशक असेल; ती विविध परंपरांच्या उपयुक्ततेला नाकारणार नाही किंवा त्यांच्याविषयी केवळ उपकार केल्याप्रमाणे सहिष्णुता ठेवणार नाही. उलटपक्षी, विविध धर्मांच्या व संस्कृतींच्या मूलतत्त्वांचे सक्रिय कौतुक करून ती स्वतःची अभिव्यक्ती करेल. सत्याची विशाल दृष्टी कोणत्याही एका श्रद्धा,**

**मतप्रणाली किंवा पंथाने मर्यादित होऊ शकत नाही; तथापि, ती माणसांना या सगळ्यांच्या मर्यादा लांघून जाण्यास मदत करते. ही मदत ती सांप्रतच्या श्रद्धा, मतप्रणाली व पंथ यांच्या उपयुक्ततेला आंधळा किंवा पूर्ण नकार देऊन नव्हे, तर त्यांच्यात दडलेले सत्याचे पैलू शोधून काढत, त्यांना ठळकपणे सामोरे आणत, उलगडत, आणि विकसित करून करत असते."** - मेहेरबाबा.

**१३. विवाहाचे पावित्र्य (Sanctity of Marriage):**

रहिवासी येथे प्रियतम बाबांवर लक्ष केंद्रित करून आपले जीवन जगण्यासाठी येतात; म्हणून बाबांच्या विवाह, शुद्धता आणि संयम याविषयीच्या इच्छांचे पालन करणे त्यांच्याकडून अपेक्षित आहे. विवाहित रहिवाशांनी बाबांच्या निर्देशानुसार विवाहातील निष्ठा व प्रामाणिकपणा यांचे पालन केले पाहिजे; तसेच अविवाहित रहिवाशांनी, ते रहिवासी असताना आणि/ किंवा ट्रस्टद्वारे बाबांना सेवा अर्पण करत असताना, बाबांच्या इच्छेप्रमाणे ब्रह्मचर्य पाळले पाहिजे.

**१४. हितसंबंधांचा अंतर्विरोध (Conflict of Interest):**

रहिवाशांनी ट्रस्टच्या सर्वोत्तम हितासाठी प्रामाणिकपणे वागले पाहिजे आणि उदभवू शकणारा हितसंबंधातील परस्परविरोध टाळला पाहिजे. परस्परविरोधी निष्ठांमुळे जर एखाद्या व्यक्तीस वैयक्तिक फायदा आणि ट्रस्टचा तोटा होणार असेल, तर हितसंबंधांतील परस्परविरोध उदभवू शकतो. जर एखाद्या रहिवाशाला संभाव्य संघर्षाबाबत शंका असेल, तर तो विषय मार्गदर्शनासाठी अध्यक्षांकडे पाठवावा. जेथे परस्परविरोधी हितसंबंध अस्तित्वात असतील, तेथे रहिवाशांनी त्या हितसंबंधांचे स्वरूप आधीच जाहीर करावे आणि संबंधित कोणतेही निर्णय घेण्यापासून वा त्यांना प्रभावित करण्यापासून अलिप्त राहावे.

**१५. गोपनीयता (Confidentiality):**

ट्रस्टविषयीची गोपनीय माहिती अनधिकृत व्यक्तींकडे उघड केली जाऊ नये.

**१६. ट्रस्टची मालमत्ता (Trust Property):**

ट्रस्टची मूर्त वा अमूर्त मालमत्ता आदराने आणि काळजीपूर्वक वापरली पाहिजे. ट्रस्टच्या मालमत्तेचा कोणताही अनधिकृत वापर करू नये.

**१७. जमीन खरेदी (Land Purchases):**

रहिवासी आणि त्यांचे निकट कुटुंबीय (उदा. आजी-आजोबा, आई-वडील, पती-पत्नी, मुले, मावश्या, काका, भाचे, चुलत भावंडे, सासरचे नातेवाईक) मेहेराबाद किंवा लगतच्या परिसरात जमीन खरेदी करण्यास इच्छुक असल्यास ट्रस्टच्या विकासकामांशी त्या खरेदीचा हितसंबंध-संघर्ष नसावा याची खात्री करून घेण्यासाठी अध्यक्षांशी संपर्क साधावा.

**१८. व्यावसायिक उपक्रम (Commercial Activity):**

ट्रस्टद्वारे प्रायोजित रहिवासी, ट्रस्टच्या परिसरात राहणारे रहिवासी आणि त्यांचे निकट कुटुंबीय (जर तेही ट्रस्टच्या जागेवर राहत असतील) कोणताही व्यावसायिक उपक्रम करू शकत नाहीत. यास अपवाद म्हणून आधीपासून चालू असलेले व्यवसाय सद्यस्थितीत चालू ठेवता येतील.

**१९. बक्षीसी /सवलती नाहीत (No Gratuities):**

रहिवासींनी, त्यांच्या रहिवासी या भूमिकेतून, भेटवस्तू, शुल्क सवलती किंवा वैयक्तिक फायद्यासाठी उपकार/सवलती यांची अपेक्षा व्यक्त करू नये. विविध बाबासंमेलनांत  बोलण्यासाठी आमंत्रित केलेल्या रहिवाशांनी प्रवास व निवास खर्चासाठी केवळ वाजवी व्यवस्था वा परतावा स्वीकारावा.

**२०. माध्यमांशी संपर्क (Media Contact):**

रहिवाशांनी ट्रस्टसाठी प्रवक्त्याच्या भूमिकेत कधीही कार्य करू नये किंवा स्वतःला ट्रस्टचे प्रतिनिधी म्हणून सादर करू नये. अध्यक्ष हे ट्रस्टचा सार्वजनिक चेहरा म्हणून नियुक्त झालेले आहेत आणि प्रसारमाध्यमांशी संपर्क—मुद्रित माध्यमे, रेडिओ, टीव्ही, इंटरनेट किंवा सोशल मीडिया नेटवर्क्स—ही अध्यक्षांची किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींची  जबाबदारी आहे.

**२१. अन्य ध्येयांना व संघटनांना पाठिंबा:**

कोणत्याही रहिवाशाने ट्रस्ट डीड व ट्रस्ट धोरणांशी, या आचारसंहितेत नमूद केलेल्या बाबीही त्यात अंतर्भूत आहे, विसंगत असलेल्या कोणत्याही हेतूचा किंवा संघटनेचा प्रचार/वा सहमतीचा आग्रह करू नये.

**२२. आचारसंहितेच्या उल्लंघनांची नोंद व कार्यवाही (Reporting and Handling Violations of the Code of Conduct):**

आचारसंहितेचे उल्लंघन अध्यक्षांकडे नोंदवले पाहिजे. गंभीर स्वरूपाची आणि/ किंवा वारंवार होणारी उल्लंघने ही प्रायोजकत्वातून रहिवाशाला काढून टाकण्याची आणि/किंवा अशी व्यक्ती ट्रस्टच्या जागेवर/ कर्मचारी वसाहतीत राहत असल्यास तेथून तिला हटवण्याची कारणे ठरू शकतात. कोणत्याही रहिवाशाने—यामध्ये ट्रस्टच्या परिसराबाहेर राहणारे पण ट्रस्टसाठी स्वयंसेवी सेवा देणाऱ्या व्यक्तीही समाविष्ट आहेत— मोठे उल्लंघन केल्यास अशा व्यक्तिला ट्रस्टसाठी स्वयंसेवी सेवा देण्याची परवानगी राहणार नाही. अशा प्रसंगी कोणती कार्यवाही करायची याचा निर्णय ट्रस्टचा "रहिवासी–प्रायोजकत्व/ आचारसंहिता व आधार विभाग" अध्यक्षांशी सल्लामसलत करून घेईल.

**२३. विश्वस्तांसाठी नीतिसंहिता (Trustees' Code of Ethics):**

ही आचारसंहिता ट्रस्टचे जे विश्वस्त रहिवासी आहेत, त्यांनाही लागू आहे. आचारसंहिता व विश्वस्तांची नीती संहिता यात परस्परविरोध झाल्यास अशा प्रकरणी विश्वस्तांची नीती संहिता प्रभावी राहील.

**२४. आचारसंहितेचे वितरण (Distribution of the Code):**

दरवर्षी रहिवाशांना ई-मेलद्वारे आचारसंहितेची प्रत मिळेल आणि इतर माध्यमांद्वारे मार्गदर्शक तत्त्वांचे संस्मरण करून दिले जाईल.

**२५. आचारसंहितेची आवृत्ती (Version of the Code):**

ही आचारसंहिता एक विकसित होत असलेला दस्तऐवज आहे आणि बोर्डाद्वारे त्यामध्ये दुरुस्त्या/बदल केले जाऊ शकतात.

अध्यक्ष आणि विश्वस्त मंडळ